ePaper

## “पुढचा नंबर केजरीवाल..”, मनिष सिसोदिया यांच्या अटकेनंतर भाजपाची प्रतिक्रिया



| वर्ष - 6 । अंक - 312 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार दि. 27 फेब्रुवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- पुणे व्हावे ‘ई-सिटी’!
- कमी टक्का, कुणाला धक्का?
- अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून
- 'मोदी अन् अदाणी एकच'


# कसब्यात 50.06 तर चिंचवडमध्ये 50.47% मतदान!

## शांततेत मतदान प्रक्रिया : आता निकालाकडे लागले लक्ष

**। पिंपरी । महाईन्यूज ।विशेष प्रतिनिधी ।**

**कसबा आणि चिंचवड विधानसभा पोटनिवडणूकीसाठी आज मतदान प्रक्रिया पुर्ण झाली. आज सकाळी ७ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया पार पडली. तसेच मतदानाची एकूण टक्केवारी किती होते, हे पाहणं महत्वाचे आहे. कसबा आणि चिंचवड विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी आज मतदान पार पडले. चिंचवडच्या मतदारसंघात एकूण ५ लाख ६८ हजार ९५४ मतदार आहेत. पोटनिवडणुकीसाठी ५१० मतदार केंद्रावर मतदान पार पडले. सकाळी ७ वाजल्यापासून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ५०. ४७ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. तर कसबा पेठ विधानसभा मतदारसंघातील १३५ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. सकाळी ७ वाजल्यापसून सायंकाळी ६ वाजेपर्यंत ५०. ०६ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. दरम्यान, २०१९ विधानसभेला चिंचवड मतदारसंघात ५६.३० टक्के मतदान झाले होते. तर कसबा मतदारसंघात ६१.५७ टक्के मतदान झाले होते. पोटनिवडणुकीत 3 टक्के मतदान कमी झाले असून हा मतांचा टक्का कोणाला धक्का देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



पिंपरी: चुरशीच्या झालेल्या चिंचवड विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत 50.47 टक्के मतदान झाले. सकाळच्या सत्रात मतदारांमध्ये निरुत्साह दिसून आला. दुपारनंतर मतदानाच्या आकडेवारीत वाढ झाली. सन 2019 च्या निवडणुकीत 53.59 टक्के मतदान झाले होते. त्यातुलनेत पोटनिवडणुकीत 3 टक्के मतदान कमी झाले असून हा मतांचा टक्का कोणाला धक्का देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

चिंचवडचे भाजप आमदार लक्ष्मण जगताप यांच्या निधनामुळे ही पोटनिवडणूक होत आहे. भाजपकडून अश्विनी जगताप, महाविकास आघाडीकडून नाना काटे तर अपक्ष राहुल कलाटे यांच्यासह 28 उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. या सर्वांचे भवितव्य मतदान यंत्रात बंद झाले आहे. सकाळी सात वाजता मतदान प्रक्रियेला सुरुवात झाली. पहिल्या दोन तासात 3.52 टक्के मतदानाची नोंद झाली. सकाळी 9 ते 11 या दरम्यान 10.45 टक्के मतदान झाले.

दुपारी 1 वाजेपर्यंत 20.68 टक्के मतदानाची नोंद झाली. त्यानंतर 3 वाजेपर्यंत 30.35 टक्के मतदान झाले. तर, सायंकाळी 5 वाजेपर्यंत 41.06 टक्के मतदानाची नोंद झाली. शेवटच्या अर्ध्या तासात 10 टक्के मतदान झाले. दिवसभरात 50.47 टक्के मतदान झाले. 5 लाख 68 हजार 954 मतदारांपैकी 1 लाख 57 हजार 820 पुरुष तर 1 लाख 29 हजार 321 महिला, इतर 4 अशा 2 लाख 87 हजार 145 लोकांनी मतदान केले. 50.47 टक्के मतदान झाले आहे.दिव्यांग मतदारांसाठी व्हिल चेअरची व्यवस्था करण्यात आली होती. नव मतदारांमध्ये उत्साह होता. विविध मतदान केंद्रावर सकाळपासूनच नवमतदारांचा चांगला प्रतिसाद पहायला मिळाला.

मतदान (ईव्हीएम) यंत्रे थेरगाव येथील स्व.शंकर आण्णा गावडे कामगार भवन येथे ठेवण्यात आली आहेत. दोन मार्च रोजी तेथेच मतमोजणी होणार आहे.

## भाजपाचा विजय निश्चित : अश्विनी जगताप

» मतदारांचा भाजपवर विश्वास असून विजय माझाच होणार असल्याचा विश्वास भाजप उमेदवार अश्विनी जगताप यांनी मतदानानंतर व्यक्त केला. चिंचवड विधानसभेच्या पोटनिवडणुकीसाठी चांगले मतदान झाले आहे. मतदारसंघातील मतदारांनी घराबाहेर पडून केलेल्या मतदानाबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहे. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी मतदारसंघात केलेल्या विकासाला मतदान करण्यासाठी मतदारांमध्ये पहिल्यापासून प्रचंड उत्साह होता. मतदान संपेपर्यंत हा उत्साह कायम राहिला. मतदारांनी मतदानातून दाखवलेला उत्साह भाजपला बळ देणारा आहे. सामान्य मतदारांचा भाजपवर विश्वास आहे की हाच पक्ष देशाला जगातील महासत्ता बनवू शकतो. चिंचवड मतदारसंघातील मतदार सुद्धा भाजपवर विश्वास व्यक्त करणारा आहे. येत्या 2 मार्च रोजी मतमोजणीतून मतदारांचा भाजपवरील विश्वास आणखी दृढ झालेला असेल. निवडणुकीत माझा विजय होणार याची मला खात्री आहे, असा विश्वास जगताप यांनी व्यक्त केला.



## महाविकास आघाडीचा विजय होईल : नाना काटे

» संपूर्ण मतदार संघात फिरत असताना, मतदारांच्या चेह-यावर दिसणार, हास्यच मला विजयाची खात्री देत होते. शेवटी एकीच बळ मिळणार फळ” हा वाक्यप्रचार महाआघाडीच्या विजयाने सत्यात उतरणार असल्याचा विश्वास महाविकास आघाडीचे उमेदवार नाना काटे यांनी मतदान प्रक्रिया संपल्यानंतर व्यक्त केला.नाना काटे म्हणाले, माझ्या आयुष्यातील न विसरता येणारी ही निवडणूक झाली. माझी उमेदवारी जाहीर झाल्या पासून मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ही निवडणूक कार्यकर्त्यांनी हातात घेतली होती. प्रत्येक कार्यकर्ता हा ‘नाना काटे’ समजूनच काम करीत होता.



## चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक

दर दोन तासांचे मतदानाचे अहवाल (मतदानाची टक्केवारी)

| अ. क्र | विधानसभा मतदार संघ | एकूण मतदार | | | | 7.00 ते सायं. 6.00 या वेळेत झालेले मतदान | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | इतर | एकूण | पुरुष | स्त्री | इतर | एकूण | पुरुष | स्त्री | इतर | एकूण |
| 1. | 205 चिंचवड विधानसा मतदार संघ | 302946 | 265974 | 34 | 568954 | 157820 | 129321 | 4 | 287145 | 52.1 | 48.62 | 11.78 | 50.47 |

# पुणे व्हावे 'ई-सिटी'!

## आगामी काळात पुण्याची ओळख ई सिटी असावी

। पुणे । महाईन्यूज ।

**पुण्याला उद्योग, शिक्षण, मनोरंजन अशा वेगवेगळ्या क्षेत्रांचा वारसा लाभला आहे. त्याचा वापर करून पुण्याने स्वतःला घडवले पाहिजे. या दृष्टीने विचार केल्यास आगामी काळात पुण्याची ओळख ई सिटी असावी. ई म्हणजे इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, एज्युकेशन, एंटरटेन्मेंट, इक्वॅलिटी आणि एनलायटनमेंट. आता भविष्यात एका क्षेत्रावर आधारित काम न होता आंतरविद्याशाखीय पद्धतीने दोन किंवा अधिक क्षेत्रे म्हणून कामे होणार आहेत.**



### पुण्याची ओळख 'ई सिटी' असावी असे वाटते

**भविष्यातील शहराचा विचार करताना आताच्या पुणे शहराचे काय होऊ शकेल, काय करणे शक्य आहे हे विचारात घेतले पाहिजे. पुण्याला उद्योग, शिक्षण, मनोरंजन अशा वेगवेगळ्या क्षेत्रांचा वारसा लाभला आहे. त्याचा वापर करून पुण्याने स्वतःला घडवले पाहिजे. या दृष्टीने विचार केल्यास आगामी काळात पुण्याची ओळख 'ई सिटी' असावी असे वाटते. ई म्हणजे इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, एज्युकेशन, एंटरटेन्मेंट, इक्वॅलिटी आणि एनलायटनमेंट. एनलायटनमेंट म्हणजे आध्यात्मिकता. तसे वातावरणही पुण्यात आहे. कारण पुण्याची जगात ओळख आचार्य रजनीश, अर्थात ओशोंमुळेही आहे.**

गेल्या काही वर्षात पुणे आणि परिसराची झालेली वाढ पाहता आता विकेंद्रित पद्धतीने शहर नियोजनाची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यासाठी शहराचा नव्याने विचार केला गेला पाहिजे. विकेंद्रित पद्धतीने शहर नियोजन करताना पाच लाख लोकसंख्येची उपनगरे विकसित करण्याची गरज आहे. ही उपनगरे भूमिगत वर्तुळाकार मार्गिकेने (रिंग रोड), उड्डाण पुलांनी जोडली पाहिजे. या विकसित होणाऱ्या परिसरात सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्यात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, खरेदी, रेस्तराँ, क्रीडा अशा सुविधांचा समावेश असेल. त्याशिवाय प्रत्येक परिसर रोजगार निर्मिती करणारा असायला हवा. त्यासाठी माहिती तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक्स, अभियांत्रिकी, आरोग्यसेवा, संशोधन, दुग्ध आणि अन्नप्रक्रिया उद्योग त्या परिसरात उभारले जावेत. प्रत्येक परिसराच्या प्रशासकीय आणि नियोजनात्मक देखभालीसाठी स्वतंत्र महापालिका असायला आणि या महापालिकांवर महानगर प्रदेश प्राधिकरणाचे नियंत्रण असू शकेल.

भविष्यातील शहराचा विचार करताना आताच्या पुणे शहराचे काय होऊ शकेल, काय करणे शक्य आहे हे विचारात घेतले पाहिजे. पुण्याला उद्योग, शिक्षण, मनोरंजन अशा वेगवेगळ्या क्षेत्रांचा वारसा लाभला आहे. त्याचा वापर करून पुण्याने स्वतःला घडवले पाहिजे. या दृष्टीने विचार केल्यास आगामी काळात पुण्याची ओळख 'ई सिटी' असावी असे वाटते. ई म्हणजे इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स, एज्युकेशन, एंटरटेन्मेंट, इक्वॅलिटी आणि एनलायटनमेंट. एनलायटनमेंट म्हणजे आध्यात्मिकता.



# कात्रज घाटात वणवा

## वनविभागाचे कर्मचारी वणवा विजविण्यासाठी कार्यरत

।कात्रज । महाईन्यूज । प्रतिनिधी।

दुपारी दीड वाजण्याच्या सुमारास कात्रज घाटात वणवा पेटला आहे. वनविभागाकडून पाच ते सहा कर्मचारी वणवा विजविण्यासाठी कार्यरत आहेत.

मात्र, वणवा आटोक्यात आणण्यात त्यांना यश आलेले नाही. सायंकाळनंतर या वणव्याने रौद्ररुप धारण केल्याचे पाहायला मिळाले.

कात्रज घाट परिसरात सुमारे ९०० हेक्टर वनक्षेत्र आहे. मात्र याठिकाणी विविध जातीचे पशु-पक्षी असून जैवविविधतेने नटलेला हा परिसर आहे. रविवारी अनेकजण याठिकाणी फिरण्यासाठी किंवा अन्य कारणासाठी जात असतात.

अशाच एखाद्या समाजकंटकाकडून हा वणवा पेटविण्यात आल्याचा अंदाज नागरिकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

> **दरवर्षी उन्हाळ्यात वणवा पेटण्याच्या घटना घडतात. त्यामुळे वणवा आटोक्यात आणण्यासाठी वनविभागाच्या वतीने काही अंतरावर चर खोदण्यात आलेली आहे. त्यामुळे काही प्रमाणात आग आटोक्यात आणण्यात यश येईल.**
>
> **- संभाजी गायकवाड, वनरक्षक**

# मतदानासाठी पैसे वाटपाचा आरोप; गंज पेठेत दोन गटांत वाद

## भाजपाच्या माजी नगरसेवकावर गुन्हा

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कसबा पेठ पोटनिवडणुकीत पैसे वाटपावरून झालेल्या वादातून दोन गटांत मध्यभागातील गंज पेठेत वाद झाला. वादाचे पर्यवसन हाणामारीत झाले. या प्रकरणी भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक विष्णू हरिहर यांच्यासह कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. परस्पर विरोधी फिर्यादींनंतर दोन्ही गटांतील २५ ते ३० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेमुळे गंजपेठेत तणाव निर्माण झाला. मध्यरात्री दोन्ही गटातील कार्यकर्ते गंज पेठ चौकीसमोर जमा झाले होते.**

याबाबत नीता किशन शिंदे (वय ४२, रा. गंज पेठ) यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी भारतीय जनता पक्षाचे माजी नगरसेवक विष्णू हरिहर, निर्मल हरिहर, हिरा हरिहर यांच्यासह १५ ते १६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी नीता शिंदे रात्री घरी होत्या. त्या वेळी विष्णू हरिहर आणि १५ ते १६ जण गंज पेठेत आले. शिंदे यांनी पैशांचे पाकीट न घेतल्याच्या कारणावरून त्यांचा भाऊ कुणाल यास धक्काबुक्की केली. तुला माज आलाय का, तुझ्या घरी खायला नाही, असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ केली.




तसेच त्याच्याबरोबर आलेल्या कार्यकर्त्यांनी कुणाल याला फळीने मारले आणि सावधान मित्र मंडळाच्या मागे मोकळ्या पटांगणात शिंदे यांच्या मावशीला धक्काबुक्की करण्यात आली. शिंदे यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. तेव्हा त्यांनाही धक्काबुक्की करण्यात आली, असे नीता शिंदे यांनी फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर महाविकास आघाडीचे कार्यकर्ते तेथे गेले. त्यांनी जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. त्यानंतर पहाटे या प्रकरणी गुन्हा दाखल झाला. दरम्यान, भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते हिरालाल नारायण हरिहर (वय ६७, रा. गंज पेठ) यांनी परस्पर विरोधी फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी विशाल कांबळे, निहाल कांबळे, गोविंद लोंढे, आकाश भोसले, सनी नाईक यांच्यासह १० ते १५ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

हिरालाल हरिहर रात्री साडेअकरा वाजता सावधान मित्र मंडळाजवळ मारुतीचे दर्शन घेऊन घरी जात होते. त्या वेळी विशाल कांबळे याने इकडे कशाला आलास, असे म्हणून जातीवाचक शिवीगाळ केली. हरिहर त्यांना समजावून सांगत होते. त्या वेळी कांबळे आणि साथीदारांनी त्यांना पटांगणात नेऊन फळीने मारहाण करण्यास सुरुवात केली. हरिहर यांनी मदतीसाठी आरडाओरडा केला. तेव्हा याला जिवंत सोडायचे नाही, अशी धमकी देण्यात आली, असे हिरालाल हरिहर यांनी दिलेल्या परस्परविरोधी फिर्यादीत म्हटले आहे.

सहायक पोलीस आयुक्त रमाकांत माने, खडक पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक संगीता यादव, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक राजेश तटकरे, उपनिरीक्षक राहुल जोग यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

### गंज पेठेत तणाव

**पैसे वाटपावरून दोन गटांत झालेल्या वादावादीनंतर गंज पेठेत तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी घटनास्थळी अतिरिक्त बंदोबस्त मागवून घेतला.**


# कमी टक्का, कुणाला धक्का?

## » मतदानाची आकडेवारी घसरली : महायुती अन् महाविकास आघाडीचे देव पाण्यात

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

चिंचवड विधानसभा मतदारसंघ पोटनिवडणुकीसाठी आज शांततेत, सुरळीत आणि उत्साहाच्या वातावरणात मतदान पार पडले. नवोदित मतदारांसह युवक, युवती, पुरुष, महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग तसेच इतर मतदारांनी आपला मताधिकार बजावला असुन या पोटनिवडणुकीसाठी ५०.४७ टक्के इतके सरासरी मतदान झाले. अपेक्षेपेक्षा मतदानाचा टक्का घसरला आहे. त्यामुळे कमी झालेला टक्का कोणाला धक्का देणार? अशी चर्चा रंगली आहे. परिणामी, महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी देव पाण्यात ठेवले आहेत.




चिंचवड विधानसभा या मतदार संघामध्ये एकूण ५ लाख ६८ हजार ९५४ मतदार होते. एकूण ५१० मतदार केंद्रावर मतदान संपन्न झाले. यापैकी मतदारसंघातील २५५ मतदान केंद्रावर वेबकास्टींगच्या सहाय्याने लक्ष ठेवण्यात आले होते. निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी थेरगाव येथील शंकरआण्णा गावडे कामगार भवनमध्ये नियंत्रण कक्ष उभारण्यात आला होता. या कक्षातून संपूर्ण मतदान प्रक्रियेवर तसेच यंत्रणेवर निवडणूक निर्णय अधिकारी सचिन ढोले लक्ष ठेवून होते. या कक्षामध्ये सहायक निवडणूक निर्णय अधिकारी अजित पाटील, शिरीष पोरेडी, शितल वाकडे, निवडणूक सहायक अधिकारी नागेश गायकवाड, माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी किरण गायकवाड, निवडणूक सहायक अधिकारी प्रशांत शिंपी, थॉमस नरोन्हा, ईव्हीएम यंत्र व्यवस्थापन कक्षाचे समन्वयक बापू गायकवाड, पोस्टल मतदान कक्षाचे समन्वयक राजेश आगळे, समन्वयक सिताराम बहुरे, बेल इलेक्ट्रॉनीक्सचे तज्ज्ञ अधिकारी, डॅशबोर्ड कक्ष समन्वयक अनिता कोटलवार, विजय बोरुडे, नायब तहसीलदार श्वेता आल्हाट, संतोष सोनवणे यांच्यासह निवडणूक विभागाचे अधिकारी कर्मचारी, संगणक चालक कार्यरत होते.

### मताधिकार बजावल्यानंतर सेल्फीचा आनंद...

दरम्यान, निवडणूक निरीक्षक एस. सत्यनारायण यांनी थेरगाव येथील नियंत्रण कक्ष तसेच यशवंतराव चव्हाण माध्यमिक शाळेमधील सखी मतदान केंद्र, रावेत येथील भोंडवे शाळेतील आदर्श मतदान केंद्र तसेच इतरही मतदार केंद्रांना भेटी देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. आदर्श मतदान केंद्रावर दिव्यांग सहायता कक्ष तसेच महिलांसाठी हिरकणी कक्षाची निर्मिती करण्यात आली होती.

सर्व मतदान केंद्रांवर दिव्यांग सहाय्यक कक्ष उभारण्यात आला होता. या ठिकाणी दिव्यांगांसाठी तसेच वयोवृद्ध मतदारांसाठी विशेष सहाय्यकासह व्हील चेअरची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच काही मतदान केंद्रावर मतदारांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता. मताधिकार बजावल्यानंतर सेल्फी काढण्याचा आनंद मतदारांनी घेतला.

### सखी मतदान केंद्र आणि आदर्श मतदान केंद्र

चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीसाठी यावेळी थेरगाव येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयांमध्ये १९५ क्रमांकाचे मतदान केंद्र 'सखी मतदान केंद्र' म्हणून तयार करण्यात आले होते.

या ठिकाणी सर्व महिला अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती. शिवाय या केंद्राची विशेष रचनाही तयार करण्यात आली होती. रावेत येथील बबनराव भोंडवे शाळेमधील २३ क्रमांकाचे केंद्र तसेच वाकड येथील महापालिकेच्या प्राथमिक शाळेतील ३९५ आणि ४०५ क्रमांकाचे केंद्र आदर्श मतदान केंद्र (मॉडेल पोलिंग स्टेशन) म्हणून तयार करण्यात आले होते.या उपक्रमाचे मतदारांनी भरभरून कौतुक केले.

### 3707 कर्मचारी, 725 पोलीस अधिकाऱ्यांची मदत...

»मतदान केंद्रावर दिव्यांगांना सहाय्य करण्यासाठी दिव्यांग कक्षाचे समन्वय अधिकारी श्रीनिवास दांगट यांनी कामकाज पाहिले. कोणत्याही मतदार केंद्रावर उद्भवलेल्या अडचणी सोडवण्यासाठी तसेच मदतीसाठी शीघ्र कृती दलाचे ( क्विक रिस्पॉन्स टीम ) ७ पथक कार्यरत होते. ईव्हीएममध्ये तांत्रिक अडचण उद्भवल्यास शीघ्र कृती दल तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन निर्माण झालेली तांत्रिक अडचण दूर करत होते. त्यामुळे मतदान प्रक्रियेला कुठेही बाधा आली नाही. या पथकात निवडणूक विभागाचे कर्मचारी, अधिकारी, बीएलओ तसेच बेल इलेक्ट्रॉनिक्स कंपनीचे अभियंते यांचा सहभाग होता. तर सेक्टर अधिकाऱ्यांकडे मतदान केंद्रनिहाय जबाबदारी सोपवण्यात आली होती. प्रत्येक केंद्राच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यासाठी ३७०७ पोलीस कर्मचारी व ७२५ अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली होती.

### दिव्यांगांनीही बजावला अधिकार...

» अंध, मूकबधीर मतदारांनी देखील आपला मतदानाचा अधिकार बजावला. ब्रेल लिपीत उपलब्ध करून दिलेल्या मतपत्रिकेमुळे अंध मतदारांना मतदानाचा अधिकार बजावण्यास मदत झाली. निवडणूक आयोगाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे आम्हाला लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये ख-या अर्थाने सहभागी होता आले. त्यामुळे स्वावलंबीपणे मतदान करता आले, अशी भावना यावेळी या मतदारांनी व्यक्त केली. सर्व मतदान केंद्रावर मूकबधीर मतदारांना सहाय्य करण्यासाठी वाचा उच्चार तज्ज्ञ देखील नियुक्त करण्यात आले होते.

# डीएसके कुंजबन सोसायटीत मराठी दिन उत्साहात

## » काव्य मैफल : बाल कलावंतांनी सादर केल्या बहारदार काव्यपंक्ती

।पिंपरी।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीचा अभिमान नव्या पिढीमध्ये रुजावा आणि मराठी भाषेप्रती आपुलकी निर्माण व्हावी. या संकल्पनेतून डीएसके कुंजबन हाउसिंग सोसायटीच्या पुढाकाराने यावर्षी मराठी भाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याला बाल कलावंतांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दि. २७ फेब्रुवारी हा मराठी भाषेचा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्ताने डीएसके कंजुबन सोसायटीतील रहिवाशांनी दि. २६ फेब्रुवारी रोजी मराठी भाषेतील काव्यांच्या मैफिलीचे आयोजन केले होते. यावेळी सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी, सचिव उत्तम नलावडे यांच्यासह सोसायटी कमिटी सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात सर्वात छोटी ४ वर्षाची काव्यप्रेमी ऋणी वाळवेकर आणि सोसायटीचे सेक्रेटरी उत्तम नलावडे ह्यांनी सरस्वती व मराठी भाषेतील ग्रंथ पुजनाने केली. सोसायटीचे कमिटी सदस्य संजय पाटील यांनी



मराठी भाषा गौरव दिनाचा इतिहास व महत्व सांगुन काव्यमैफिलीस प्रारंभ झाला.

कार्यक्रमाची संकल्पना, आयोजन व सूत्रसंचलन विद्या जोशी यांनी केले. सोसायटीतील अतुल सावळे-पाटील यांनी आजच्या काळात मराठी भाषा टिकवणे किती आवश्यक आहे याविषयी मार्गदर्शन केले. सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

### मराठी पाऊल पडते पुढे....

»कार्यक्रमामध्ये सर्वच वयोगटातील काव्यप्रेमींनी सहभाग घेऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या सर्वांमध्ये लहानग्या मुला-मुलींचा सहभाग व सादरीकरण वाखाणण्याजोगी होती. झाडे, पाऊस, नदी, समुद्र, प्राणी, पक्षी, प्रेम, वात्सल्य, माणुसकी, भाषेचा अभिमान, शौर्य, पराक्रम अशा विविध विषयास अनुसरून अनेक कवींनी लिहिलेले काव्य डीएसके कुंजबन परिसरात गुंजत होते. हे गुंजन मराठी पाऊल पडते पुढे यांनी आठवण मनामनात ठासवतही होते.

## संपादकीय »

### नाव सेवेचे अन उतरंड नोटांची

***गेल्या काही वर्षात देशभरात ज्या असंख्य बुवा,बाबा आणि विविध धार्मिक पंथांचे पीक फोफावले आहे त्यावर नजर मारल्यास असे लक्षात येते की मोफत सेवेच्या नावाखाली यांच्या तिजोऱ्या सामान्य भाविक एवढ्या भरून टाकतात की त्यातून प्रचंड मुजोरी आणि पुढे या सगळ्या बुवा, बाबात अहंकार निर्माण होऊन त्यांची पावले गुन्हेगारीकडे वळतात.***

दानपेट्या आणि विविध मार्गाने आलेला पैसा स्वतःचे साम्राज्य निर्माण करण्यात हे लोक खर्च करतात ,त्यातून मंदिर आणि धर्मशाळांच्या नावाने महाल उभे केले जातात. लोकांना भव्यतेचे आकर्षण असते त्याला बळी पडून परोपकारी मानसिकता असणारा भक्तवर्ग दानपेट्या भरायला सुरुवात करतो. आजच्या घडीला ज्याची जेवढी विनामूल्य सेवेची जाहिरात असेल तेवढा तो बाबा किंवा संस्थान धनाढ्य असते. टीव्हीवर दररोज दर्शन देणाऱ्या प्रत्येक बाबाचा कारभार किमान पाच हजार कोटींच्या वर झाल्याचे आताच्या काळातील आर्थिक सर्व्हे सांगतो.

सध्याच्या स्पर्धेच्या काळात ९० टक्के कुटुंब ,परिवार व्यक्तिगत समस्यांनी ग्रासलेले असतात. मध्यंतरी मुंबईच्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने केलेल्या एका पाहणीत असे आढळून आले आहे की एका मध्यमवर्गीय कुटुंबात किमान १५ समस्या असतात. आजार,शिक्षण,मुलांचे संगोपन,ज्येष्ठांची जबाबदारी,संपत्तीचे वाद,पतिपत्नी मधील विसंवाद ,पती,वा मुलांची व्यसनाधीनता ,असाध्य आजारांचे आक्रमण ,आर्थिक ओढाताण,मुलामुलींच्या लग्नाच्या समस्या ,सासू-सुनांचे वादंग,यांचा परिणाम त्या कुटुंबावर किंवा प्रमुखांवर सतत होत असतो. या जंजाळातून कायमची मुक्ती मिळण्याचे मार्ग त्यांना बुवा,बाबांच्या कीर्तन ,कथा किंवा प्रवचनातून खुणावत असतात. पतिपत्नीच्या विसंवादातून निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे कुठलातरी बाबा जवळ सापडतील अशी वेडी आशा बाळगून संभ्रमित झालेले हजारो लोक कुण्यातरी आश्रमाची वाट धरायला लागतात. मध्यप्रदेशातील बागेश्वर धाम,पांडोखर धाम आणि त्याचे सोशल मीडियावर व्हायरल होणारे चमत्काराचे व्हिडीओ बघून आपल्याही जीवनात असा एखादा चमत्कार व्हावा यासाठी लोक या फसव्या बुवा,बाबांच्या कडे आकर्षित होतात. मध्यप्रदेशातील भिंड जिल्ह्यात पांडोखर धाम नावाचे संस्थान आहे. गुरुशरण शर्मा उर्फ पांडोखर सरकार नावाचा बाबा लोकांच्या मनातील समस्या परची म्हणजे अर्जातून ओळखण्याचा दावा करतो.

# मनातले ओळखण्याची बेमालूम हातचलाखी !




जगातले असे आता एकही क्षेत्र असे उरले नाही की ज्याला विज्ञानाचा स्पर्श झाला नाही. सगळ्याच क्षेत्रात विज्ञानाचा वापर करीत जगभर प्रगतीचे विविध टप्पे आपण गाठत आहोत. अलीकडे कृत्रिम बुद्धिमत्तेचा विविध क्षेत्रात वापर व्हायला लागला आहे. जिथे विज्ञानाचा प्रवेशही व्यर्ज होता त्या धार्मिक,अध्यात्मिक क्षेत्रातही याच विज्ञानाचा वापर सर्वाधिक केला जात आहे. जिथले देव साक्षात आहेत असे समजले जाते तिथेही वीज,सरकते जिने,वातानुकूलित यंत्रणा ,प्रसादाच्या आधुनिक मशिनरी ,संगणक ,विविध इलेक्ट्रानिक डिव्हाईस यांचा मुबलक वापर सुरु आहे. मंदिरावर पडणाऱ्या दरोड्याचा मुकाबला करण्यासाठी अत्याधुनिक शस्त्रे वापरली जात आहेत. देव जागृत असताना मंदिराची देखरेख करण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे अहोरात्र काम करीत असतात नव्हे मंदिरात गोळा होणाऱ्या देणग्या सुद्धा आधुनिक यंत्रांच्या मदतीने मोजल्या जाताहेत. या संपत्तीचा विनियोग ऑनलाईन पद्धतीने करताना याच विज्ञानाचा सर्वाधिक उपयोग केला जात आहे.

एखाद्या गुन्हेगाराच्या किंवा अतिरेक्यांच्या तोंडून कटाचे नियोजन वदवून घेण्यासाठी अजूनही कोणत्या दिव्यशक्तीचा नव्हे तर लाय डिटेक्टर किंवा पॉलिग्राफ चाचण्यांचा वापर केला जातो. अशाकाळात कुणी साधूच्या वेशात आपल्या मनातले ओळखतो यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांची संख्या लाखोंच्या संख्येत मोजली जात असेल तर आपण नेमके कोणत्या दिशेने निघालो आहोत याचा सगळ्यांना विचार करण्याची वेळ आली आहे. मनातले ओळखण्यासाठी सध्या आपल्या देशात ज्यांचा धुमाकूळ सुरु आहे त्यातले एक आहेत धीरेंद्र शास्त्री महाराज. मध्यप्रदेशात असे आणखी एक बाबा आहेत त्यांचे नाव आहे पंडोखर बाबा. या दोघांचे आपसात पटत नाही कारण दोघांचाही लोकांना फसवण्याचा धंदा जोरात सुरु आहे. दोघेही मध्यप्रदेशातील आहेत आणि पर्ची सादर करून दोघेही संकटात असलेल्या लोकांचे भविष्य सांगण्याचा दावा करीत असतात.

मध्यप्रदेशातील खजुराहो पासून १५ किमी अंतरावर छतरपूर जिल्ह्यात गडा नावाच्या खेड्यात जुने मारुतीचे मंदिर आहे. तिथे पन्नास वर्षांपूर्वी भगवानदास गर्ग नावाचे पुजारी मंदिराची देखभाल करून दर मंगळवारी अंगात मारुतीचा संचार झाल्याचे भाविकांना भासवून त्यांच्या समस्या सोडवत असत. ज्यांना भूतबाधा,प्रेतबाधा किंवा जादूटोणा,करणी केली असेल अशांवर ते उपचार करण्याचा देखावा करून तात्पुरते समाधानी करीत असत. त्यांच्यानंतर त्यांचा मुलगा कृपालदास गर्ग यांनी हा व्यवसाय सांभाळला आणि मांत्रिकाचा व्यवसाय वाढीस लागला. कृपालदास गर्ग याना दोन मुले आणि एक मुलगी आहे. लहान मुलगा धीरेंद्र हा कसाबसा बारावी पर्यंत शिकला पुढे त्याला गरिबीमुळे शिक्षण घेता आले नाही. वडिलांच्या व्यवसायात भरपूर धनप्राप्ती असल्याचे त्याच्या लक्षात आल्यावर त्याने पाच सहा वर्षांपूर्वी बागेश्वर धाम मंदिराचा कारभार सांभाळायला सुरुवात केली.

४ जुलै १९९६ रोजी जन्मलेले धीरेंद्र गर्ग उर्फ धीरेंद्र कृष्ण शास्त्री अवघे २७ वर्षाचे आहेत. बारावीनंतर त्यांनी कुठल्यातरी खासगी विद्यापीठातून पदवी प्राप्त केल्याचे सांगितले जाते. आजोबानी सुरु केलेला बुवाबाजी आणि अंधश्रद्धेचा व्यवसाय नातवाने टेकओव्हर केल्यावर त्याला इतरांच्या सल्ल्याने आधुनिक स्वरूप दिले. तीन वर्षांपूर्वी जिल्ह्यातही फारसी ओळख नसलेल्या बागेश्वर धाम आणि धीरेंद्र शास्त्रीला देशभरात लाखो भाविक ओळखायला लागले याचे सगळे श्रेय आधी सोशल मीडिया आणि नंतर आस्था या धार्मिक चॅनेलला जाते. लोकांचे अर्ज बोलावून त्यांचे दरबारात भविष्य सांगण्याचा प्रकार पंडोखर धाम वर आधीपासून केला जात होता त्यात थोडाफार बदल करून धीरेंद्र महाराजाने आधुनिक प्रसार माध्यमांचा सुंदर उपयोग करून सोबत हिंदुत्वाचा

## मानवाधिकाराची दुकाने

**देशाच्या संसदेने " मानव अधिकार संरक्षण अधिनियम २००६ " करून अधिकृत दर्जा प्रदान केला. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि त्या त्या राज्याचा राज्य मानव अधिकार आयोग अश्या केवळ दोनच अधिकृत संस्था सध्या कार्यरत आहेत. या दोन्ही संस्था स्वायत्त असून त्यांना कायद्याचे संरक्षण आणि अधिकार प्राप्त झालेले आहेत.**

शासकीय,निमशासकीय यंत्रणांच्या माध्यमातून अनेकदा व्यक्तींच्या मूलभूत अधिकाराचे हनन होते ,काही प्रसंगात अनेकांना मानवी हक्क सुद्धा नाकारले जातात अशावेळी त्यांच्या मानवी हक्काचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांच्या पाठीशी उभी राहणारी दुसरी सरकारी यंत्रणा म्हणून आपल्या देशात १२ ऑक्टोबर १९९३ रोजी राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची स्थापना झाली. पुढे त्याला देशाच्या संसदेने " मानव अधिकार संरक्षण अधिनियम २००६ " करून अधिकृत दर्जा प्रदान केला. राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि त्या त्या राज्याचा राज्य मानव अधिकार आयोग अश्या केवळ दोनच अधिकृत संस्था सध्या कार्यरत आहेत. या दोन्ही संस्था स्वायत्त असून त्यांना कायद्याचे संरक्षण आणि अधिकार प्राप्त झालेले आहेत. या आयोगावर काम करणाऱ्या अध्यक्ष आणि सदस्यांना अर्धन्यायिक अधिकार असतात त्यामुळे कोणत्याही प्रकरणात मानवाधिकार आयोगाने लक्ष घातले की भल्याभल्यांचे आपल्या देशात धाबे दणाणते असे म्हटले जाते.

या दोन अधिकृत आयोगांच्या शिवाय सध्या आपल्या देशात आणि राज्यात मानवाधिकार ही नवे घेऊन किंवा त्याच्या मागेपुढे विविध विशेषणे लावून काम करणाऱ्या संघटनांचे पेव फुटलेले आहे. मानवाधिकार संघटना,मानवाधिकार फौंडेशन किंवा आंतरराष्ट्रीय मानवाधिकार संघ इत्यादी नावाने कार्यरत असणाऱ्या कोणत्याही संघटनांना काडीचीही किंमत नाही हे लक्षात घ्या. पत्रकारिता कशाशी खातात याची धड माहिती नसताना हजारो लोक जसे बोगस पत्रकार संघटनांची ओळखपत्रे गळ्यात लटकावून फिरत असतात तशीच गत मानवाधिकार बाबत सध्या झाली आहे. सध्याच्या घडीला आपल्या देशात मानवाधिकार नावाने किमान चारशे ते पाचशे संघटना कार्यरत आहेत. नोंदणी शुल्क घेऊन आणि वरून ओळखपत्राची रक्कम घेऊन कुणालाही सहज मानवाधिकार संघटनांचे कोणत्याही पदाचे ओळखपत्र घेऊन आपल्या परिसरात दुकानदारी सुरु करता येते.

केंद्र सरकारच्या अखत्यारीत असणाऱ्या राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे न्यायमूर्ती अरुणकुमार मिश्र हे अध्यक्ष असून ज्येष्ठ माजी सनदी अधिकारी डॉ. ज्ञानेश्वर मुळे त्याचे आपल्या राज्यातील सदस्य आहेत. केंद्र आणि राज्य मानवाधिकार आयोगाच्या शिवाय इतर सगळ्या संघटना याना कोणतेही अधिकार नाहीत ,लोकांनी किंवा सरकारी अधिकारी कर्मचारयांनी सुद्धा अशा संस्थांची वैधता तपासून घ्यावी. जर या संघटनांचे पदाधिकारी पैसे किंवा कागदपत्रे मागत असतील तर त्यांची पूर्तता कुणीही करू नये ,गरज वाटल्यास नजीकच्या पोलीस किंवा इतर सरकारी यंत्रणांकडे त्याची तक्रार करावी आणि त्याची माहिती राज्य मानवाधिकार आयोगाला द्यावी असे आवाहन डॉ. मुळे यांनी केले आहे. केंद्रीय मानव अधिकार आयोगाकडे सुद्धा

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून

## विधिमंडळात सत्ताधारी, विरोधकांची सत्वपरीक्षा

। मुंबई । महाईन्यूज ।

**राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवारी (27 फेब्रुवारी) सुरु होत आहे. राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती,पोटनिवडणुकीची धामधूम अशा हे अधिवेशन होत आहे. यानिमित्ताने पुन्हा एकदा सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जोरदार कलगीतुरा पहावयास मिळणार आहे.सत्ताधारी शिंदे,फडणवीस सरकारचा पहिला अर्थसंकल्पही 28 फेब्रुवारीला सादर होणार आहे.याबाबतही सर्वसामान्यांमध्ये उत्सुकता लागली आहे.**



शिंदे,फडणवीस सरकारचे हे तिसरे अधिवेशन होय.या कालावधीत राज्यातील बदललेली राजकीय परिस्थिती,शिवसेनेचे झालेले विभाजन याचे पडसाद या अधिवेशनात जोरदारपणे उमटण्याची शक्यता वर्तविली आहे.त्यातच कसबा आणि चिंचवड पोटनिवडणुकीचे निकालही 2 मार्चला लागणार आहेत.त्याचाही परिणाम अधिवेशन काळात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात जोरदार खडाजंगी,आरोप,प्रत्यारोप,घोषणाबाजी आदी प्रकार यावेळीही जनतेला पहावयास मिळणार हे नक्की.



रविवारी विधीमंडळातील विरोधी पक्षाच्या नेत्यांची पार पडली. या बैठकीला कॉँग्रेसचे नेते रायपूर येथे शिबीर असल्याने उपस्थित राहिले नाहीत मात्र बाळासाहेब थोरात यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी चर्चा करुन झालेल्या निर्णयाला पाठिंबा दिला अशी माहिती सुरुवातीलाच अजित पवार यांनी दिली. यावेळी माजी मंत्री छगन भुजबळ, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी मंत्री अनिल परब, मुख्य अनिल पाटील, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, आ.कपिल पाटील, आ. विनोद निकोले, आ.सुनील प्रभू आदी उपस्थित होते.

### सरकारी चहामध्ये सोन्याचा अर्क अजित पवारांची खोचक टीका

विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सत्ताधारी शिंदे गटाची शिवसेना आणि टीका केली आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर प्रसारमाध्यमांशी बोलताना पवार यांनी सरकारकडून जाहिरातबाजीवर वारेमाप खर्च केला जात आहे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी असलेल्या निधीचे वितरण झालेले नाही. आर्थिक वर्ष संपत आले. त्यामुळे हा निधी परत जणार आहे, अशी टीका केली आहे. तसेच मागील चार महिन्यात मुख्यमंत्र्यांच्या वर्षा या निवासस्थानावरील जेवणाचे बील 2 38 लाख रुपये आले आहे. सरकार चहामध्ये सोन्याचा अर्क टाकते का? असा खोचक सवालही अजित पवार यांनी केला आहे.विकासकामांमध्ये राजकारण होत असल्याने विकासाच्या प्रक्रियेला फटका बसला आहे. अर्थसंकल्पात मागे मंजूर केलेल्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे. त्यामुळे विकासकामे ठप्प पडली आहेत. एक महिना तीन दिवसांनी आर्थिक वर्ष संपणार जिल्हा वर्षिक योजनेचे किती पैसे खर्च झाले, याची माहिती काढावी. अजिबात पैसे खर्च झालेले नाहीत. निधीचे वितरण नाहीये. सरकार तिथे लक्ष देण्यास कमी पडले आहे, असा आरोप अजित पवार यांनी केला आहे.

### अजित पवारांचा हल्लाबोल

**पत्रकारांच्या अंगावर गाडी घालून हत्या होणार असेल, माजी मंत्री आणि त्यांच्या धमकी दिली जात असेल, खासदारांनाही मारण्याची सुपारी दिली जात असेल, एक ठाण्यातील अधिकारी अंडरवर्ल्डची धमकी देऊनही त्याला पाठीशी घातले जाते मग हे राज्य कुठल्या दिशेला जात आहे. कुठे आहे कायदा व सुव्यवस्था आहे असा संतप्त सवाल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी सरकारला केला आहे.**

# सागरी मार्गाने मुंबईची वाहतूक समस्या मिटणार

## नोव्हेंबर 2023 पर्यंत हा प्रकल्प पूर्णत्वाला आमचा प्रयत्न

। मुंबई । महाईन्यूज ।

**दक्षिण मुंबईतील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी येत्या मरीन ड्राईव्ह ते वरळी सागरी किनारा मार्ग पूर्ण करण्याचे आमच्या पथकाचे प्रयत्न राहतील, असा विश्वास मुंबई महानगरपालिकेच्या सागरी किनारामार्ग विभागाचे मुख्य अभियंता मंत्तय्या स्वामी यांनी मुंबईकरांना दिला आहे .**



मुंबई महानगरपालिकेतर्फे पत्रकारांना सागरी किनारा मार्ग पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते .यावेळी तेथील अभियंत्यांनी सविस्तर माहिती दिली. 12 हजार कोटी रुपयांच्या सागरी किनाऱ्याची मुहूर्तमेढ 2014 साली शिवसेना – भाजप सरकारच्या काळात रोवण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात ऑक्टोबर 2018 साली कामाला सुरुवात झाली. त्यात कोरोनामुळे 2 वर्ष वाया गेली.मात्र आता नोव्हेंबर 2023 पर्यंत हा प्रकल्प पूर्णत्वाला नेण्याचा आमचा प्रयत्न आहे, अस यावेळी स्वामी यांनी पत्रकारांना सांगितले.

प्रसिद्ध एल अॅण्ड टी आणि कन्स्ट्रक्शन कंपनी या सागरी किनारा प्रकल्पाचे काम करीत आहेत. कॉन्क्रीटचे 70 टक्के काम पूर्ण झाले आहे.पहिल्या टप्यात 11 मीटर व्यासाचे 2 बोगदे तर एक आच्छादित बोगद्याचे काम पूर्ण झाले आहे. या बोगद्यात अग्निशमन यंत्रणा असून त्याकरीता सुमारे 4 लाख लीटर पाण्याची टाकी बांधण्यात आली आहे .एकूण 111 हेक्टर क्षेत्रावर टाकण्यात आला. त्यापैकी 70 हेक्टर क्षेत्राचे हरित क्षेत्र करण्यात आले आहे.

बोगद्यांमध्ये हवा खेळती राहावी म्हणून युके मधील सकार्डो वायव्हीजन प्रणाली योजना राबविण्यात आली आहे.11 मीटर व्यासाचे बोगदे खोदण्यासाठी चीनवरून अवाढव्य असा मावळा यंत्र एल एन्ड टी कंपनीने मागवले होते.या सागरी मार्गावर 16 सबवे 2 पोलीस चौक्या बांधण्यात आल्या तट संरक्षक भिंत बांधण्यात आली असून यामुळे किनाऱ्याची धूप होण्यापासून तसेच वादळी वारा,लाटा आणि पुरापासून संरक्षण होईल. प्रसिद्ध महालक्ष्मी मंदिर आणि प्रसिद्ध हाजीअली बाबा दर्गा जवळील भागही संरक्षित होईल .पुढील 100 वर्षाचा विचार करून याचे डिझाईन तयार करण्यात आले आहे,अशी माहिती स्वामी यांनी दिली.

### इंधन आणि वेळेची बचत

**सागरी रस्ता 8 पदरी तयार होणार आहे.मुंबईकरांची 70 टक्के वेळेचे बचत होणार असून 34 टक्के इंधनाची बचत होईल. तसेच वाहनांमुळे होणारा ध्वनि प्रदूषण व वायु प्रदुषण कमी होईल.हिरवीगार उद्याने,सायकल ट्रॅक,जॉगिंग ट्रॅक, वरळी येथे सार्वजनिक पार्किंग व्यवस्था करण्यात येणार आह.सागरी किनारा मार्गावर नाविन्यपूर्ण प्रकाशयोजना करण्यात येणार असल्यामुळे या परिसराला एक वेगळी झळाळी सागरी मार्गाचे स्वप्न लवकरच पूर्ण होईल या करिता आमची पूर्ण टीम अहोरात्र काम करित असा अस मुख्य अभियंता मंत्तय्या स्वामी यांनी पत्रकारांना सांगितले .**

# शेतकऱ्यांला 512 किलोच्या कांद्याचे मिळाले 2 रुपये!

। नाशिक महाईन्यूज ।

**राज्याचं उद्यापासून अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सत्ताधारी पक्षाने चहापानाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मात्र या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. चहापानाच्या कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला.**



देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बार्शी येथील राजेंद्र चव्हाण यांनी ५१२ किलो कांदा विक्रीला आणला होता. छोटा कांदा असतो, तो कमी प्रतीचा असतो. त्याला १०० ते १५० भाव मिळतो. तर चांगल्या प्रतीच्या कांद्याला ५०० ते १४०० रुपये दर मिळतो. या पद्धतीने चव्हाण यांना ५१२ रुपये आले. मात्र त्यांच्या हातात दोन रुपये आले. त्याच कारण म्हणजे एकूण रकमेतून वाहतुकीचा खर्च वजा करण्यात आला.

२०१४ साली आपण जीआर काढला आहे. त्यात आपण कमी प्रतिच्या दरातून वाहतुकीचा खर्च वजा करता येत नाही. मात्र तो खर्च वजा केल्याने शेतकऱ्याला दोन रुपये मिळाले. ही बाब लक्षात येताच संबंधीत सूर्या व्यापाऱ्याचा परवाना रद्द करण्यात आल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. या मुद्दावरून विरोधीपक्षनेते अजित पवार यांनी शिंदे सरकारवर कडाडून टीका केली होती.आपल्या बाजुचे तीनही देश अडचणीत आहे. त्याच्याकडे परकीय चलनाचा तुटवडा आहे. त्यामुळे तीनही देशांनी आयात बंद केली आहे.

शिवाय कर्नाटक, राजस्थान या राज्यात कांदा पिकविण्यात येत आहे. त्यामुळे निर्यात करण्याची संधी नाही. आता याबाबत काय करता येईल, त्यासाठी बैठका घेण्याचा काम सुरू असल्याचं फडणवीसांनी नमूद केलं.

# 'मोदी अन् अदाणी एकच'!

## काँग्रेसच्या अधिवेशनामधून राहुल गांधींचा निशाणा

।रायपूर।महाईन्यूज।

**छत्तीसगडची राजधानी रायपूर येथे काँग्रेसचं ८५वं अधिवेशन सुरु आहे. आज या अधिवेशनाचा तिसरा आणि शेवटचा दिवस आहे. राहुल गांधी यांनी केंद्र सरकारसह गौतम अदाणी यांच्यावर जोरदार टीका केली आहे.**



अधिवेशनामध्ये मनोगत व्यक्त करतांना राहुल गांधी म्हणाले की, भारत जोडो यात्रेदरम्यान देशातल्या सगळ्या भागात जाण्याचं भाग्य मिळालं. या यात्रेतून मला खूपकाही शिकायला मिळालं. या यात्रेतून मला खूप प्रेम मिळाल्याचं गांधी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि आरएसएस हे गौतम अदाणींना सुरक्षा देण्याचं काम करीत आहेत. त्यांची शेअर कंपनी हजारो कोटी रुपये परदेशात पाठवत आहे. तरीही सत्तेत असून नरेंद्र मोदी काही करु शकत नाहीयेत. मुळात अदाणी आणि मोदी एकच आहेत, असं राहुल गांधी म्हणाले.

काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये संघटनेशी संबंधित अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या. यामध्ये आरक्षण, सदस्यत्व, एआयसीसी मेंबर, सीडब्ल्यूसी आणि संघटनेशी संबंधीत नियम बदलले आहेत. या माध्यमातून काँग्रेसने मोठी राजकीय खेळी केल्याचं निदर्शनास येतंय.

### काँग्रेसमधील आरक्षण

» पीसीसी आणि एआयसीसीमध्ये आरक्षण देण्यात येणार आहे. एससी, एसटी आणि ओबीसी समाजाला ५० टक्के आरक्षणाचा प्रस्ताम मंजूर करण्यात आला. तसेच आरक्षित आणि अनारक्षित जागांमध्ये ५० टक्के पदांवर महिला आणि ५० वर्षांखालील लोकांना संधी मिळणार आहे.

### सदस्यत्वाशी संबंधित निर्णय

» काँग्रेसमध्ये आता फक्त डिजिटल सदस्य नोंदणी होणार आहे. तसेच सदस्यत्व नोंदणी करतांना आई आणि पत्नीचं नाव जोडावं लागणार आहे.

---

# पुलवामामध्ये दहशतवाद्यांचा हल्ला!

## काश्मिरी पंडितावार झाडल्या गोळ्या

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

काश्मीर खोऱ्यात पुलवामामध्ये दहशतवाद्यांनी पुन्हा हल्ला केला आहे. दहशतवाद्यांनी आज (रविवार) काश्मिरी पंडित संजय शर्मा यांच्यावर गोळीबार केला आणि घटनास्थळावरून पळ काढला. संजय शर्मा यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, मात्र त्यांचा मृत्यू झाला.

माहितीनुसार पुलवामामध्ये अचन भागात राहणारे संजय शर्मा रविवारी काही कामासाठी बाजारात जात होते. यादरम्यान दहशतवाद्यांनी त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते जखमी झाले. स्थानिक लोकांनी पोलिसांच्या मदतीने त्याला रुग्णालयात नेले, मात्र त्याला वाचवता आले नाही.

दरम्यान पोलीस आणि सुरक्षा दल दहशतवाद्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी परिसरात नाकेबंदी केली आहे.

दहशतवाद्यांनी यापूर्वी शुक्रवारी रात्री देखील आसिफ अली यांच्यावर हल्ला केला होता. आसिफ अली नमाज अदा करून मशिदीतून परत येत होते. यावेळी दहशतवाद्यांनी त्यांना घेरले. बिजबिहारा भागातील हसनपोरा तवेला येथे दहशतवाद्यांनी त्यांना गोळ्या घालून जखमी केले. जखमी अवस्थेत त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.जखमीचे वडील अली मोहम्मद गनई हे पोलिसात हेड कॉन्स्टेबल होते. २९ जानेवारी २०२२ रोजी मशिदीबाहेर दहशतवाद्यांनी त्यांची गोळ्या झाडून हत्या केली.



# काँग्रेसमध्ये आता ५० टक्के पक्षांतर्गत आरक्षण!

## दलित, आदिवासी, ओबीसी, मागास, महिला, तरुणांचा समावेश



।नवी दिल्ली। महाईन्यूज।प्रतिनिधी।

**काँग्रेसने पक्षाच्या घटनेमध्ये दुरुस्ती करण्याचा निर्णय घेतला असून सुमारे ८५ बदल केले जाणार आहेत. पक्षातील सर्व स्तरांतील ५० टक्के पदे दलित, आदिवासी, ओबीसी, मागास, महिला आणि तरुणांसाठी राखीव ठेवली जातील, अशा महत्त्वाच्या घटनात्मक बदलाचा प्रस्ताव काँग्रेसच्या रायपूर महाअधिवेशनात ठेवण्यात आला असून या बदलांना रविवारी अधिकृत मंजुरी दिली जाईल.**

ब्लॉक समिती, जिल्हा समिती, प्रदेश समिती, राष्ट्रीय समिती आणि कार्यकारिणी समिती या सर्व स्तरांवरील पक्षाच्या समित्यांमधील ५० टक्के पदे दलित, आदिवासी, ओबीसी आणि अल्पसंख्याकांना ५० टक्के आरक्षित असतील. शिवाय, आरक्षित पदे आणि खुली पदे या दोन्ही पदांवर मिळून ५० वर्षांखालील तरुणांना तसेच, महिलांसाठी ५० टक्के पदे राखीव असतील

.पक्षाच्या कार्यकारिणी समितीची सदस्य संख्या २५ होती, आता ती वाढवून ३५ करण्यात आली आहे.

त्यातील ५० टक्के जागा राखीव असून हे सदस्य दलित, आदिवासी, ओबीसी, अल्पसंख्य, महिला आणि तरुण असतील. पक्षाचे आजी-माजी पंतप्रधान व पक्षाध्यक्ष हेही सदस्य असतील. त्यामुळे पक्षामध्ये उभे आणि आडवे असे दुहेरी आरक्षण देण्याची तरतूद केली आहे, अशी माहिती महासचिव रणदीप सुरजेवाला यांनी दिली.

### नोंदणी आता ऑनलाइन

» काँग्रेसची सदस्य नोंदणी आता फक्त ऑनलाइन केली जाणार आहे. पक्षातील कामकाज विनाकागद करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

» बुथ हा प्राथमिक स्तर असेल. पंचायत समिती, मंडळ समिती, ब्लॉक समिती, जिल्हा समिती आणि प्रदेश समिती अशी संघटनात्मक रचना करण्यात आली आहे.

» पक्षाच्या सदस्यत्वाच्या अर्जामध्ये स्त्री-पुरुषसह तृतीय पंथीय या वर्गवारीचाही समावेश असेल.


» सदस्याला वडिलांसह आई तसेच पत्नीचे नावही लिहिता येईल.

» विविध स्तरांवर निवडून आलेल्या काँग्रेसच्या प्रतिनिधींना प्रदेश समितीचे सदस्य असतील.

» प्रदेश समितीतील ८ सदस्यांऐवजी ६ सदस्यांमागे १ प्रतिनिधी राष्ट्रीय समितीचा सदस्य असेल. त्यामुळे अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या सदस्यांची संख्या १२४० वरून १६५३ वर गेली आहे.

## आम्ही मराठी परंपरा जपतो असं म्हणणाऱ्या.. अखेर शशांकने सूनावलेच..

होणार सून मी ह्या घरची', 'हे मन बावरे', 'पाहिले न मी तुला' यांसारख्या मालिकांमधून घराघरात पोहोचलेला अभिनेता शशांक केतकर (SHASHANK KETKAR)अभिनयसोबतच सामाजिक, राजकीय विषयावर देखील भाष्य करत असतो. यावरून अनेकदा त्याला ट्रॉल देखील केले आहे. परंतु त्याने कायमच आपली भूमिका हि परखडपणे मांडली आहे. आता त्याने पुन्हा एकदा मोठ्या मुद्द्याला हात घातला आहे. तो म्हणजे मराठी भाषा.उद्या 27 फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन. सर्वत्र मराठी भाषेचा जागर करण्याचा दिवस. याच निमित्ताने भाषा दिनाच्या पूर्वसंध्येला शशांकने एक पोस्ट शेयर करून सर्वांची शाळा घेतली आहे.'घर बंदूक बिरयानी'मधल्या 'गुन गुन' गाण्याचं तेलुगू आणि तामिळ व्हर्जन तिथंही घालतय धिंगाणा..शशांक कायमच महत्वाच्या विषयांकडे लक्ष वेधत असतो. आपण कायमच मराठी मराठी करत असतो. मराठी भाषा, मराठी अस्मिता यांच्या आपण अनेक बाता मारत असतो. पण खरच आपण मराठीपण जपतो का? आपल्याला मराठी भाषा नेमकी माहीत आहे का? यावर विचार करायला





## लग्नानंतर कठीण बनलं होतं माधुरीचं आयुष्य...

८० आणि ९० च्या दशकात माधुरी दिक्षितनं हिंदी सिनेमावर राज्य केलं. त्यावेळी सगळ्यात अधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींमध्ये तिचं नाव पहिलं घेतलं जायचं. १९९९ मध्ये डॉ. श्रीराम नेने यांच्यासोबत लग्न करून माधुरी अमेरिकेला शिफ्ट झाली तेव्हा तिचे चाहते खूप नाराज झाले होते.

श्रीराम नेने व्यवसायानं डॉक्टर आहेत. त्यांना २ मुले अरिन नेने आणि रैयान नेने आहेत. अमेरिकेला जाऊन माधुरी आपल्या कुटुंबासोबत बिझी झाली. जेव्हा मुलं थोडी मोठी झाली तेव्हा ती आपल्या पतीसोबत भारतात परतली. आणि त्यानंतर ती पुन्हा अभिनयात सक्रिय झाली. पहिल्यांदाच माधुरीनं लग्नानंतर बदलेल्या तिच्या आयुष्यावर बोलत अनेक खुलासे केले आहेत.माधुरीन श्रीराम नेने यांच्या युट्युब चॅनेलवर सांगितलं आहे की,"तुम्हा डॉक्टरांचे जे आयुष्य आहे ते खूप धावपळीचं असतं. मग दिवस असो की रात्र..तुमचा संपूर्ण दिवस हा कॉलवरच अनेकदा जातो". माधुरी पुढे म्हणाली,"अनेकदा हे खूप कठीण होऊन बसतं जेव्हा तुम्ही मुलांना पाहता,त्यांना शाळेत सोडता,पुन्हा घेऊन येता आणि घरातील इतरही गोष्टी करता. जेव्हा तुमची गरज असते तेव्हा तुम्ही कुटुंबासोबत नसता. कारण तुम्ही हॉस्पिटलमध्ये असता. कधी मी आजारी असते तेव्हा तुम्ही तिथे नसता कारण तुम्हाला कुणा इतराची काळजी घ्यावी लागते. तर या सगळ्या अशा कठीण गोष्टी माझ्या वाट्याला आल्या".



## भूमी एकदा आरशात तरी पाहायचं

बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयाबरोबरच बोल्डनेसनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेणारी अभिनेत्री म्हणून भूमीचं नाव घ्यावं लागेल. सध्या भूमी एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे. त्याचे कारण तिची साडी. यामुळे भूमीला नेटकऱ्यांनी ट्रोल केले आहे. तिच्या त्या व्हिडिओवरून कमेंट केल्या आहेत त्यावरुन नेटकऱ्यांचा राग दिसून येईल.

एका पार्टीमध्ये भूमी पेडणेकर आणि क्रिती सेन सहभागी झाल्या होत्या. यामध्ये दोन्ही अभिनेत्रींनी साडी परिधान केली होती. मात्र त्यांचा मेक अप हा चाहत्यांना काही आवडली नाही. त्यामुळे त्या दोघींना देखील ट्रोल केले आहे. एकानं तर भूमी तुला काही कळतं की नाही, तू आऱशात एकदा पाहायला हवे होते. क्रितीला देखील नेटकऱ्यांनी चांगलेच झाडले आहे. आपण सुंदर आहोत हे जरी खरं असलं तरी बऱ्याचदा मेकअपनं चेहरा बिघडतो. याची काळजी घ्यावी लागेल.त्या रात्री भूमी आणि क्रितीनं एका अ‍ॅवॉर्ड शो ला हजेरी लावली होती. त्यांनी आयव्होरी रंगाची साडी परिधान केली होती. त्यांच्या त्या व्हिडिओला नेटकऱ्यांची मोठी पसंती मिळाल्याचे दिसून आले. यापूर्वी देखील भूमीला तिच्या फोटो आणि व्हिडिओमुळे ट्रोल व्हावे लागले होते. तिची फॅशन,बोल्डनेस हा वादाचा विषय झाला होता. गेल्या काही दिवसांपासून भूमी चर्चेत आली आहे.

## अखेर अक्षय कुमारने सोडलं मौन

बॉलिवूडचा खिलाडी कुमार अर्थात अक्षय कुमार, खिलाडीप्रमाणे बॉलिवुडमधील सर्वात महागडा कलाकार अशी त्याची ओळख आहे. नुकताच त्याचा 'सेल्फी' चित्रपट प्रदर्शित झाला आहे. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर फारशी कामगिरी करू शकला नाही. आजवर अक्षयने बरेच चित्रपट सुपरहिट करून दाखवले आहेत मात्र तितकेच फ्लॉप चित्रपटदेखील दिले आहेत. नुकतेच त्याने चित्रपट फ्लॉप होण्यावर भाष्य केलं आहे.अक्षय कुमार सातत्याने चर्चेत येत असतो. सेल्फी चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच त्याने एका मुलाखतीत फ्लॉप चित्रपटांबद्दल आणि त्याने कबूल केले आहे यासाठी केवळ तोच दोषी आहे. आजतकला दिलेल्या मुलाखतीत तो असं म्हणाला, "माझ्याबरोबर हे काही पहिल्यांदा घडलेले नाहीत. एक काळ असा होता की माझे एकामागून एक १६ चित्रपट फ्लॉप चालले नाहीत. चित्रपट चालत नाही ही तुमचीच चूक आहे. प्रेक्षक बदलले आहेत आणि तुम्हालाही बदलून पुन्हा काम करावे लागेल.



## दिल टूटा हैं...." मानसी नाईकचं नवं हिंदी गाणं प्रेक्षकांच्या भेटीला

आपल्या उत्तम नृत्यशैलीमुळे प्रेक्षकांच्या नजरा खिळवून ठेवणारी अभिनेत्री म्हणून मानसी नाईकला ओळखले जाते. 'बघतोय रिक्षावाला', 'बाई वाड्यावर' या गाण्यांमुळे ती घराघरात पोहोचली. नुकतेच तिचे हिंदी अल्बममधील एक गाणे सध्या चर्चेत आहे. या गाण्याचे नाव 'दिल टूटा हैं तो क्या 'असून ते आता यूट्यूबवरदेखील प्रदर्शित झालं आहे. हे गाणे स्वरूप भालवणकर यांनी संगीतबद्ध आणि गायले आहे. याच गाण्यावर तिने भाष्य केलं आहे.मानसी नाईक ही सोशल मीडियावर कायमच सक्रीय असते. ती नेहमी तिचे विविध फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. तसेच साधय ती तिच्या वैवाहिक आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. काही दिवसांपूर्वी मानसीने पती प्रदीप खरेरापासून विभक्त होणार असल्याचं जाहिर केलं. फ्री प्रेस जर्नलशी बोलताना ती असं म्हणाली "माझा पहिला व्हिडिओ अल्बम आहे.



# बेथ मुनीने अंतिम सामन्यात रचला इतिहास!

## ‘ही’ कामगिरी करणारी ठरली पहिली खेळाडू

।वेलिंग्टन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**ऑस्ट्रेलियाची सलामीवीर बेथ मुनीने रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध महिला टी-२० विश्वचषक २०२३ च्या अंतिम सामन्यात अर्धशतक झळकावून इतिहास रचला. ऑस्ट्रेलियन संघासाठी नाणेफेक जिंकून डावाची सुरुवात करणाऱ्या मुनीने ४४ चेंडूत अर्धशतक पूर्ण केले. त्याचबरोबर महिला टी२० विश्वचषकाच्या इतिहासातील अंतिम सामन्यात दोन अर्धशतके झळकावणारी ती जगातील पहिली खेळाडू ठरली.**



बेथ मुनीने ५३ चेंडूत ७४ धावांची खेळी केली. तिने आपल्या खेळीच ९ चौकार आणि एक गगनचुंबी षटकार लगावला. त्याचबरोबर संघाला २० षटकांत ६ बाद १५६ धावांपर्यंत नेण्यात मोलाची भूमिका बजावली. २०२० मध्ये झालेल्या महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात बेथ मुनीने भारताविरुद्ध ७८ धावांची नाबाद खेळी केली होती. यावेळी ती ७४ धावा करून नाबाद राहिली. मुनीने १३९.६२च्या स्ट्राइक रेटने फलंदाजी केली आणि संघाला सुरक्षित धावसंख्या गाठून दिली.

### सलग दुसऱ्यांदा विश्वचषकात बॅटने धमाका केला

सलग दुसऱ्यांदा महिला टी-२० विश्वचषकात बेथ मुनीची कामगिरी प्रभावी ठरली आहे. मुनीने ५१.५० च्या प्रभावी सरासरीने आणि ११७.७१ च्या स्ट्राइक रेटने २०६ धावा केल्या आहेत, टूर्नामेंटच्या ६ सामन्यांच्या ६ डावांमध्ये दोनदा नाबाद राहिली आहे. ती स्पर्धेत सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत इंग्लंडच्या नताली स्कायव्हर (२१६) नंतर दुसऱ्या स्थानावर होती. २०२० मध्ये, मूनीने विश्वचषक स्पर्धेत ६ सामन्यांमध्ये ६४.७५च्या सरासरीने आणि १२५.१२च्या स्ट्राइक रेटने २५९ धावा केल्या. दोन्ही वेळा तिच्या बॅटमधून ३-३ अर्धशतके झळकली आहेत.

### विश्वचषकातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या

महिला टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात सर्वात मोठी खेळी खेळण्याचा विक्रम बेथ मुनीच्या नावावर आहे. रविवारी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध नाबाद ७४ धावांची खेळी करून ती स्वत:च्याच विक्रमाची बरोबरी करण्यास मुकली. २०२० मध्ये तिने भारताविरुद्ध नाबाद ७८ (५४) खेळून विश्वविक्रम आपल्या नावावर केला. याच सामन्यात ३९ चेंडूत ७५ धावा करणारी एलिसा हिली या यादीत दुसऱ्या स्थानावर आहे. रविवारी आपल्या अर्धशतकासह, मुनीने विश्वचषक फायनलमधील सर्वात मोठ्या खेळीच्या यादीत पहिले आणि तिसरे स्थान गाठले आहे..

# भारतीय कसोटी संघात उप-कर्णधार...!

## माजी कोचच्या विधानाने उडाली खळबळ

। केपटाउन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**जागतिक टेबल टेनिस (WTT) स्टार कंटेंडर स्पर्धा येत्या सोमवारपासून (ता. २७) गोव्यात खेळली जाईल. या स्पर्धेच्या निमित्ताने ऑलिंपिक विजेते मा लाँग व चेन मेंग भारतात प्रथमच खेळतील.**



टीम इंडिया सध्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध बॉर्डर-गावसकर ट्रॉफी कसोटी मालिका खेळत आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या 2 कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाचा उप-कर्णधारपद केएल राहुल होता. परंतु पुढच्या दोन सामन्यांसाठी जेव्हा संघाची निवड झाली तेव्हा केएल राहुल यांना उप-कर्णधारातून काढून टाकण्यात आले. असे मानले जाते की या मालिकेत आता नवीन उप-कर्णधाराची घोषणा केली जाऊ शकते. या सर्वांच्या दरम्यान एका भारतीय दिग्गज व्यक्तीने उप-कर्णधाराबद्दल एक मोठे विधान केले आहे.भारताचे माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांचा असा विश्वास आहे की भारतीय संघात व्हाईस -कॅप्टन नेमण्याची गरज नाही. शास्त्री यांनी राहुलच्या भारतीय संघातील स्थानाबद्दल सविस्तरपणे बोलले आहे. आयसीसी पॉडकास्टवर रवी शास्त्री यांनी हे सांगितले, टीम मॅनेजमेंट निर्णय घेईल. त्यांना त्यांचे स्वरूप माहित आहे. मी एकावर विश्वास ठेवतो, भारतासाठी उप-कर्णधार कधीही नियुक्त करत नाही. त्याऐवजी मी सर्वोत्कृष्ट इलेव्हनसह जाईन आणि कर्णधाराला मैदान सोडायचे असेल तर आपण अशा खेळाडूची निवड कराल, कारण आपल्याला गुंतागुंत तयार करण्याची आवश्यकता नाही.

रवी शास्त्री पुढे म्हणाले, जर उप-कर्णधार कामगिरी करत नसेल तर कोणीतरी तिची जागा घेऊ शकेल. मला घरगुती परिस्थितीत उप-कर्णधार कधीच आवडत नाही. परदेशात ते वेगळे आहे. येथे आपल्याला एक चांगला फॉर्म हवा आहे, आपल्याला शुबमन गिल सारखा खेळाडू हवा आहे. तो आव्हान देईल. या मालिकेत आतापर्यंत केएल राहुलने तीन डावांमध्ये 38 धावा केल्या आहेत

रोहित शर्मा (कर्णधार), लोकेश राहुल, शुबमन गिल, चेटेश्वर पूजारा, विराट कोहली, के.एस. भारत (विकेटकीपर), ईशान किशन (विकेटकीपर), रवीचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, रेविंदरा जादरामद, मोहमम , सूर्यकुमार यादव, उमेश यादव आणि जयदेव उनाडकाट.

# ऑलिंपिक विजेते सोमवारपासून गोव्यात

## शरथ कमल, साथियन, मनिकावर भारताची मदार

। गोवा । महाईन्यूज ।

जागतिक टेबल टेनिस (WTT) स्टार कंटेंडर स्पर्धा येत्या सोमवारपासून (ता. २७) गोव्यात खेळली जाईल. या स्पर्धेच्या निमित्ताने ऑलिंपिक विजेते मा लाँग व चेन मेंग भारतात प्रथमच खेळतील.

ताळगाव पठार येथील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी इनडोअर स्टेडियममध्ये पाच मार्चपर्यंत स्पर्धेची चुरस असेल. एकेरीत यजमान भारताची मदार दिग्गज टेबल टेनिसपटू अचंता शरथ कमल, साथियन ज्ञानशेखरन, पायस जैन, गोव्याचा वेस्ली दो रोझारियो यांच्यासह मनिका बत्रा हिच्यावर असेल. श्रीजा अकुला व सुहाना सैनी या भारतीय संघातील अन्य महिला खेळाडू आहेत. स्पर्धेच्या पात्रता फेरीतील लढती २७ व २८ रोजी होतील, तर स्पर्धेची मुख्य फेरी १ ते ५ मार्च या कालावधीत खेळली जाईल. भारतात होणारी ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठेची टेबल टेनिस स्पर्धा आहे. स्तुपा स्पोर्टस अॅनालिटिक्स व आंतरराष्ट्रीय टेबल टेनिस महासंघ यांच्यातर्फे गोवा सरकार व भारतीय टेबल टेनिस महासंघाच्या सहकार्याने स्पर्धा घेण्यात येत आहे.

